# पर्यावरण संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण आवश्यक

## डॉ. ए. जी. उंटवाले, वनस्पतीशास्त्र विभागात राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
जागतिक पर्यावरणाच्या संवर्धनासाठी खारफुटीचे संरक्षण व संवर्धन अत्यावश्यक बाब आहे. तसे न झाल्यास मानवी अस्तित्वासाठी ते मारक ठरणार आहे, असे प्रतिपादन मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडियाचे कार्यकारी सचिव डॉ. ए. जी. उंटवाले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे 'मॅनग्रोव्हज अ‍ॅन्ड कोस्टल रिसोर्सेस' विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



शिवाजी विद्यापीठ वनस्पतीशास्त्र अधिविभाग आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना ए. जी. उंटवाले, कुलगुरू देवानंद शिंदे. सोबत व्ही. डी. जाधव, एन. एस. चव्हाण, डी. के. गायकवाड, डॉ. एस. एस. कांबळे.

डॉ. उंटवाले म्हणाले, पर्यावरणाच्या दृष्टीने खारफुटीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. केवळ सागरी जल पर्यावरणाबरोबरच इतर पर्यावरणाच्या दृष्टीनेही त्याचे मोठे महत्त्व आहे. निसर्गातील अतिरिक्त कार्बन शोषून घेण्याची अन्य वनस्पतींच्या तुलनेत खारफुटीची क्षमता अधिक असते. त्याचप्रमाणे सागराला जमिनीवर अतिक्रमणापासून रोखणारी ती नैसर्गिक भिंत आहे. पायाभूत सुविधा निर्माणाच्या नावाखाली खारफुटीचा होत असलेला ऱ्हास अंतिमतः मानवी अस्तित्वाच्या मुळावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे खारफुटीचे संरक्षण व संवर्धन यासाठी शासकीय, शैक्षणिक, संशोधकीय तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या स्तरांवरही प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, खारफुटीच्या प्रश्नासंदर्भात शिवाजी विद्यापीठाने केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरही मोठे योगदान दिले आहे. विद्यापीठाच्या संशोधकांनी संशोधन व जनजागृतीसाठी काम केले आहे. भारताला सुमारे ७ हजार २०० किलोमीटरचा लाभलेल्या सागरी किनाऱ्याच्या नैसर्गिक संरक्षणासाठी खारफुटीचे महत्त्व खूप आहे. त्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडियाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ सक्रिय योगदान देण्यासाठी सदैव तत्पर आहे.

मान्यवरांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले. परिषदेची स्मरणिका व 'मंगलवन' या विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. एन. एस. चव्हाण यांना 'मॅनग्रोव्हज सोसायटी ऑफ इंडिया'चा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अधिविभाग प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत, डॉ. एन. एस. चव्हाण यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. एस. एस. कांबळे यांनी आभार मानले.

16 APR 2019 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांचे विचार वृद्धिंगत करण्याची गरज

## ज्येष्ठ पत्रकार संजय आवटी यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ पत्रकार संजय आवटी. सोबत डावीकडून डॉ. एस. एस. महाजन, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. व्ही. गुरव.

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा एक व्यापक विचार आहे. त्यांच्याविषयीचे आपले आकलन जिथे संपते, तिथे खरे डॉ. बाबासाहेब सुरू होतात. त्यामुळे त्यांच्याविषयीचे आकलन सातत्याने वृद्धिंगत करीत राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार संजय आवटी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर- आजच्या संदर्भात' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते.

आवटे म्हणाले, डॉ. आंबेडकर समजून घेताना त्यांनी भारताला एकसंघ देश म्हणून ज्या पद्धतीने उभे केले, तो वारसा समजून घेतला पाहिजे. जगभरातले राजकीय विचारवंत भारत हा एक राष्ट्र म्हणून उभाच राहू शकत नाही, अशा स्वरुपाची मांडणी करीत असताना आंबेडकरांनी मात्र त्याला उभे करून, त्याचे खणखणीत अस्तित्व निर्माणही केले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते फुले, शाहू, आंबेडकरांचा सच्च्या राष्ट्रवादाचा व लोकशाहीचा वारसा आपण अभिमानाने मिरविला पाहिजे, असे आवाहनही आवटे यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्यातून माणूस होण्याचेच धडे आपल्याला मिळतात. या देशातल्या प्रत्येक नागरिकाला भारतीय ही ओळख मिळवून देण्याचे महान कार्य त्यांनी केले. त्यांचा वारसा अखंडित प्रवाहित ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

दरम्यान मुख्य प्रशासकीय इमारतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, आंबेडकर सेंटरचे संचालक डॉ. एस. एस. महाजन, शाहीर आझाद नायकवडी यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, शहरातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

6 APR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पेटंट घेण्यासाठी संशोधकांना मिळणार सहाय्य

## आयपीआरसाठी कृती योजनेंतर्गत संशोधक विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ : रोजगाराभिमुख संशोधनाला चालना

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

इंटेललेक्चुअल प्रॉपर्टी राइट्स (आयपीआर) तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगभरातल्या बौद्धिक नवकल्पनांचे रक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे संशोधक विद्यार्थ्यांना त्यांच्या कामासाठी पेटंट ॲप्लिकेशन्स दाखल करण्यास विद्यापीठ अनुदान देवून प्रोत्साहित करणार आहे. विद्यापीठात सध्या ३० पेटंट असून जवळपास २० पेटंट यशस्वी होण्याच्या मार्गावर आहेत. या अनुदानाच्या माध्यमातून तयार होणाऱ्या पेटंटचा उपयोग संशोधकासह विद्यापीठाच्या नावलौकीक उंचावण्यासाठी होईल.

आयपीआर फॅसिलिटेशन सेंटरच्या माध्यमातून महाविद्यालये आणि विद्यापीठामध्ये कार्यशाळांद्वारे पेटंटविषयी जागरूकता अभियान राबवले आहे. एक पेटंट मालमत्तेच्या निर्मात्यास २० वर्षांच्या कालावधीसाठी अधिकार असतो. २० वर्षानंतर, हे सार्वजनिक डोमेनमध्ये विनामूल्य आहे, कोणत्याही व्यक्तीद्वारे किंवा संस्थेद्वारे विविध



- औद्योगिक संशोधनात विद्यापीठ आघाडीवर
- विद्यापीठाचे आयपीआरवर लक्ष केंद्रित
- विद्यापीठात ३० पेटंट फाईल, तर २० पेटंट मिळण्याच्या मार्गावर

उद्देशांसाठी या पेटंटचा वापर केला जातो. स्थानिक उद्योगांशी चर्चा करून त्यांच्या आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम तयार करण्याच्या सूचना सरकारने दिल्या आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने काही दिवसांपूर्वी उद्योजकांची बैठक घेवून चर्चाही केली आहे. या चर्चेतून स्थानिक उद्योगाच्या गरजा जाणून घेतल्या आहेत. भविष्यात या उद्योगांना पूरक मनुष्यबळ देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

सध्या संशोधनाशिवाय शिक्षण निरर्थक आणि अस्तित्वहीन बनत चालले आहे, एकूण विद्यार्थी संख्येपैकी ३० टक्के विद्यार्थ्यांनाच रोजगार मिळत आहे. विद्यापीठाचे अभ्यासक्रम रोजगार मिळण्यास पूरक ठरतील असे तयार करून त्यामध्ये संशोधनाचा टक्का वाढवण्यावर विद्यापीठाने आपले लक्ष केंद्रीत केले आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण असेल तरच देशातील बेकारीचे प्रमाणही कमी होईल. म्हणूनच विद्यापीठाने संशोधकांना पेटंट फाईल करण्यासाठी लागणारा सर्व खर्च देण्याचा निर्णय घेतला आहे. या खर्चामुळे संशोधनाचे पेटंटमध्ये रूपांतर करणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांची संख्या वाढेल. बऱ्याचदा संशोधनाचा दर्जा चांगला असतो, पण आर्थिक व अन्य अडचणीमुळे संशोधक पेटंट फाईल करीत नाहीत. म्हणून विद्यापीठाने पेटंट फाईलसाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. कारण राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार, सन २०१७-१८ मध्ये संशोधन व विकास (आर अँड डी) च्या उद्योगासाठी भागीदारी असलेल्या शिवाजी विद्यापीठाला (एसयूके) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत सर्वाधिक स्थान मिळाले आहे.

शिवाजी विद्यापीठाने विविध कंपन्यांसोबत प्रासंगिक करार (एमओयू) केले आहेत. या करारांचा फायदा विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या ज्ञानाची देवाण-घेवाण होईल. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात साखर कारखाने, कास्टींग, कापड निर्मिती, लेदर उद्योगांचे प्रमाण उल्लेखनीय आहे. त्यामुळे या इंडस्ट्रीला पूरक अभ्यासक्रम तयार करून, त्यामध्ये संशोधन वाढवणे काळाची गरज आहे. म्हणूनच विद्यापीठाने पेटंट फाईल करण्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे.



### पेटंट घेण्याचे प्रमाण वाढेल

शिवाजी विद्यापीठात समाजोपयोगी संशोधन करण्यासाठी व संशोधनाला मुर्त स्वरूप देण्यासाठी पेटंटला अनुदान देण्याचा निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आहे. यातून संशोधकांनाही संशोधन करण्यासाठी चालना मिळेल. पेटंट फाईलचा खर्च विद्यापीठाने केला तर नक्कीच संशोधनासह पेटंटचे प्रमाण वाढेल.

**शिवाजी विद्यापीठ कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे**

### पेटंट नोंद करण्यासाठीची पद्धत

पेटंट फाईल झाल्यानंतर त्याच्या रीन्यूसाठी फी द्यावी लागते. तसेच आपल्या पेटंटचे उल्लंघन करून कोणी प्रॉडक्ट तयार करत असल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी लागते. एकदा पेटंट मंजूर झाल्यावर अधिकृतरित्या त्याचा आपल्या व्यवसायासाठी उपयोग करू शकतो. पेटंटची प्रोसेसव्दारे संशोधन प्रोटेक्ट करून पैसे कमवू शकतो व नवीन उद्योगात पदार्पण करु शकतो.

सकाळ

# पाण्याची काटकसरच वाचवेल शेती, पर्यावरण

## प्रा. के. एम. देसाई यांचे संशोधन; शिवाजी विद्यापीठाची मिळवली पीएच.डी.

भूषण पाटील : सकाळ वृत्तसेवा



के. एम. देसाई

आर. के. नगर, ता. १५ : 'जास्त पाणी दिले तर जास्त उत्पादन येते हा गैरसमज आजही शेतकऱ्यांमध्ये आहे. यातून पाण्याचा अतिवापर आणि पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी पाणीपुरवठा संस्था, शासन आणि शेतकऱ्यांच्या पातळीवर पुढाकाराची गरज आहे. शहाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. के. एम. देसाई यांनी 'लिफ्ट एरिगेशन को-ऑपरेटिव्ह अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट; ए स्टडी इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' या विषयावर संशोधन करून नुकतीच पीएच. डी. मिळवली आहे. या संशोधनादरम्यान हे निष्कर्ष समोर आले आहेत.

जिल्ह्यातील बहुतांश गावांत पाणी पुरवठा संस्था आहेत. पाणी पुरवठा संस्थांनी गावात सामाजिक आर्थिक विकास कसा घडवला व पर्यावरणाच्या पातळीवर याचे काय परिणाम झाले याचा अभ्यास या शोध निबंधात प्रा. देसाई यांनी केला आहे. यासाठी त्यांनी सहा तालुक्यातील १२ पाणी पुरवठा संस्था आणि ४२१ शेतकऱ्यांचा अभ्यास केला. पाणी पुरवठा संस्थांमुळे गावांमध्ये सामाजिक सुधारणा होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर सुधारला असला तरी पाणी बचतीबाबत शेतकरी आजही गंभीर नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जिल्ह्याचे प्रमुख पीक ऊस असल्याने त्याला जितके जास्त पाणी मिळेल तितके उत्पादन जास्त होईल, असा समज त्यांचा आहे. वास्तविक अति पाण्यामुळे उत्पादन घटते हे विज्ञान सांगते. मात्र पाट पद्धतीने पाणी पाजण्याची पारंपरिक पद्धत ते सोडायला तयार नाहीत.

यासिवाय गटशेती, ठिबक सिंचन, पाण्याचे समान वाटप, सेंद्रिय खते वापरण्याबाबत त्यांची सकारात्मक मानसिकता नाही. पाणी आणि रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमिनीचा ऱ्हास होत आहे.

जिल्ह्यातील शेतजमिनीचा पोत कमी होऊन त्या क्षारपड बनत चालल्या आहे. शेतकऱ्यांची ही मानसिकता बदलण्यासाठी पाणी पुरवठा संस्था पासून ते शासनापर्यंत सर्वांनीच पुढाकार घेण्याचा गरज आहे. दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. अशा परिस्थितीत पाणी बचतीबाबत प्रबोधन व ठोस कृती झाली नाही तर जिल्ह्यावर पाणीटंचाईचे संकट आहेच.

### निष्कर्ष असे

- पाणी पुरवठा संस्थांनी ठिबक सिंचनाला प्राधान्य द्यावे.
- ठिबक सिंचन असलेला ऊस प्राधान्याने नेण्याची भूमिका कारखानदारांनी घ्यावी.
- पाणी पुरवठा संस्थांनी एकरी नव्हे, तर तासिका तत्त्वावर पाणी द्यावे.
- शेतकरी शेतात हजर असेल तरच पाटकऱ्यांनी पाणी द्यावे.
- शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा असला पाहिजे.
- अल्पभूधारकांनी गट शेतीला प्राधान्य द्यावे; अन्यथा जमिनीचे सामान वाटप करावे.

> संशोधनादरम्यान ४२१ शेतकऱ्यांच्या प्रश्नावली पद्धतीने केलेल्या अभ्यासात ७५ टक्के शेतकऱ्यांनी खत व पाण्याचा अति वापर करत असल्याचे मान्य केले. मात्र त्यात बदल करण्याची त्यांची मानसिकता नाही. पाणीपुरवठा संस्था प्रशासन व कारखानदार यांनी पुढाकार घेतल्यास त्यांचे परिवर्तन होऊ शकते; मात्र त्यासाठी सातत्याने प्रबोधनाची व प्रोत्साहनाची गरज आहे.
>
> - डॉ. प्रा. के. एम. देसाई
>
> समाजशास्त्र विभागप्रमुख, शहाजी महाविद्यालय

Kolhapur, Kolhapur-Today
16/04/2019 Page No. 7

# घाळी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आवंडीवाडीचा केला अभ्यास

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत डॉ. घाळी कॉलेजमधील समाजशास्त्र विभागाला संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. त्यासाठी ९ एप्रिल रोजी डॉ. घाळी कॉलेजमधील समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी अवंडीवाडीतील धनगर समुदायाचा अभ्यास केला.

यासाठी क्षेत्र भेटीचे नियोजन बी. बी. वाघमोडे व सरला आरबोळे यांनी केले. प्रगत समाजापासून अलिप्त असलेल्या व जंगलात वास्तव्य करणाऱ्या आजरा तालुक्यातील अवंडीवाडीतील धनगरवाडा क्र. १, २, ३ मधील ३० कुटुंबांची माहिती घेतली. यामध्ये त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक जीवनपद्धतीचा संपूर्ण अभ्यास केला. त्यांना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते, तसेच सध्या त्यांच्या पूर्वीच्या जीवनपद्धतीमध्ये व आताच्या जीवनात काय बदल झालेला आहे, याचाही तुलनात्मक अभ्यास केला. यासाठी बी. ए. भाग ३ समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यासाठी सरला आरबोळे व विश्वनाथ तराळ यांनीही विद्यार्थ्यांसमवेत क्षेत्र भेटीमध्ये सहभाग घेतला.

यावेळी प्राथमिक शाळा धनगरवाडा क्र. १ शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना वह्या व खाऊ वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक पाटील यांनी शाळेविषयी माहिती दिली. कार्यक्रमास अनिल मगर, सरपंच बाबू येडगे, बयाजी येडगे यांनी सहकार्य केले. प्राचार्य मंगलकुमार पाटील, मिलिंद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## जत्राटकर यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे



जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांना वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. जाहीर झाली. त्यांनी 'दलितमुक्तीचा प्रश्न : ब्राह्मणेत्तर आणि दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांना, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना कुलगुरू देवानंद शिंदे, प्र कुलगुरू डी. टी. शिर्के, विभागप्रमुख डॉ. निशा मुडे, डॉ. अशोक चौसाळकर, एन. डी. जत्राटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

लोकमत

# 'सुटा'ची कुलगुरूंसमवेत चर्चा करण्याची तयारी

## कुलपतींना आज निवेदन देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अधिकृत बैठकीस बोलविल्यास कुलगुरूंवरील आरोपांबाबत चर्चा करण्यास शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) तयार आहे. आचारसंहिता असल्याने आज, मंगळवारी दुपारी तीन वाजता होणारे धरणे आंदोलन करण्यास पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली आहे. त्यामुळे या आंदोलनाऐवजी संघटनेतर्फे कुलपती यांना कुलगुरूंमार्फत निवेदन देण्यात येणार आहे.

'सुटा'ने केलेले आरोप, आंदोलन हे विद्यापीठाची बदनामी करावी या हेतूने केलेले नाहीत. याउलट कुलगुरूंच्या गैर, बेकायदेशीर कृत्यांमुळेच विद्यापीठाची बदनामी होत आहे. 'सुटा'ने जानेवारी २०१९पासून कुलगुरूंच्या



गैरकारभाराविरुद्ध आंदोलन पुकारले आहे; परंतु कुलगुरूंनी आंदोलनाच्या संदर्भात चर्चेसाठी गेल्या महिन्यात एकदाही अधिकृतपणे पत्र पाठवून बोलविले नाही. तरीही कुलगुरु चर्चेस तयार आहोत, अशी निवेदने करतात. ही त्यांच्या वर्तनपद्धतीतील विसंगीतच आहे. सुटाने वारंवार चर्चेस तयार आहोत, असे लेखी कळविले आहे. तेव्हा अधिकृत बैठकीस बोलविल्यास सुटाची चर्चेची तयारी आहे, अशी माहिती सुटाचे प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी पत्रकाद्वारे दिली.

पुढारी

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यावरील आरोपाबाबत 'सुटा'ची चर्चेची तयारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यावरील आरोपाबाबत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाची (सुटा) चर्चेची तयारी आहे, अशी माहिती प्रमुख कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी पत्रकाद्वारे दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या गैरकारभाराविरोधात 'सुटा'चे अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. 'सुटा' चर्चेस तयार असून बैठकीस बोलाविल्यास जाऊ, अशी भूमिका आहे, असे पत्रकात म्हटले आहे. दरम्यान, पोलिसांनी मंगळवारी होणाऱ्या धरणे आंदोलनास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे आंदोलनाऐवजी दुपारी तीन वाजता कुलपती यांना कुलगुरूंमार्फत निवेदन देण्यात येणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे.

My Kolhapur Edition
16 Apr, 2019 Page No. 2
Powered by : erelego.com